स्थापना जुन २०००

गुरू विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ लक्कड जवळगा संचलित
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड संलग्नित

।। विद्या गुरूणां गुरूः ।।


NAAC GRADE : $B^+$ (CGPA = 2.54)

# शिवनेरी महाविद्यालय

## (कला, वाणिज्य, विज्ञान)

शिरूर अनंतपाळ जि. लातूर. फोन : (०२३८४) २९९२५९, २९९२६०
Email -shivneriprincipal@gmail.com
Website - shivnericollegeshiruranantpal.com

## माहिती पुस्तीका



## महाविद्यालयाचे श्रध्दास्थान



# स्व. ॲड. विश्वंभरराव माने

(संस्थापक अध्यक्ष, गुरू विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कड जवळगा)

## उत्पत्ती (Genesis)

गुरू विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ लक्कड जवळगा या संस्थेची स्थापना १९९५ साली शैक्षणिक व सामजिक उन्नतीसाठी करण्यात आली.

स्व. ॲड. विश्वंभरराव माने साहेब आणि पद्माकर मोगरगे, कै. तुकाराम माडे, यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शैक्षणिक संस्था उभी केली त्यानंतर आज पावेतो संस्थेची प्रगती सातत्याने होत आली आहे. जून २००० मध्ये गुरू विश्वंभर कृपा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेने शिरूर अनंतपाळ येथे शिवनेरी महाविद्यालयाची स्थापना करून कला शाखेतून उच्च शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहचविली. महाविद्यालयाच्या प्रगतीकरिता संस्थेचे अध्यक्ष स्व.ॲड. विश्वंभरराव माने साहेब सतत प्रयत्नशिल होते.

संस्थेने या भागातील ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची निकड जाणून घेऊन याच महाविद्यालयात विज्ञान व वाणिज्य या दोन नविन विद्या शाखा जून २०१० पासून सुरू केल्या आहेत. आज महाविद्यालयातून शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

# प्राचार्यांचे मनोगत



रयतेचे राज्य स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म ज्या किल्ल्यावर झाला त्या किल्ल्याच्या नावाने शिवनेरी महाविद्यालय असे नाव व शिक्षणाची द्वारे सर्वांसाठी खुले करणाऱ्या महात्मा जोतीराव फुले यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून कै. ॲड. विश्वंभरराव माने, कै. तुकाराम माडे व श्री पद्माकर मोगरगे यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्मित शिरुर अनंपाळ तालुक्याच्या मुख्यालयी सन २००० साली शिवनेरी महाविद्यालयाची स्थापना केली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या कार्यक्षेत्रात व या शिरुर अनंतपाळ तालुक्यात कला, वाणिज्य, विज्ञान शाखा असणारे पहिले व एकमेव वरिष्ठ महाविद्यालय आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, सामान्य व हुशार मुलांमुलींना ही मोठी संधी व सोय शिवनेरी महाविद्यालयाच्या रूपाने उपलब्ध झालेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व राष्ट्रीय मुल्यांकन एवंम प्रत्यायन परिषद (NAAC) यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेवुन महाविद्यालयाला नॅक (NAAC) मानांकनात $B^+$(CGPA 2.54) दर्जा बहाल केला ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे.

शिवनेरी महाविद्यालय सर्व सोयी-सुविधांनी युक्त असून भव्य क्रीडांगण, निसर्गरम्य वातावरण, सुसज्ज व भव्य इमारत, स्वतंत्र जिमखाना, क्रीडा इनडोअर हॉल, मुलीचे वसतीगृह व विज्ञान व भूगोल विषयासाठी अद्यावत प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा इंटरनेट सुविधेसह, उपहारगृह, सायकल स्टँड, प्रसाधनगृहे आज महाविद्यालयात उपलब्ध आहेत. प्राध्यापक व विद्यार्थ्यांची ज्ञानवृद्धी करण्यासाठी आमच्या महाविद्यालयात सुसज्ज ग्रंथालय असून त्यात दुर्मिळ ग्रंथ, संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, पाक्षिके इ. वाचन साहित्य उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचन कक्षाची सुविधा आहे. तसेच महाविद्यालयात (N.S.S.) हा स्वतंत्र विभाग कार्यरत असून या विभागामार्फत विशेष शिबीराबरोबरच रक्तदान, पशुचिकित्सा, आरोग्य शिबीर, वृक्षारोपण, स्वच्छता शिबीर इत्यादी विविध उपक्रम राबविले जातात.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हा उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये सतत १००० दिवस आय.ए.एस. आपल्या भेटीला व स्पर्धा परीक्षेच्या यासंदर्भात दैनंदिन सायंकाळी ६ ते ७ या वेळेत तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन देण्याची सुविधा महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेली आहे. करिअर कट्टा अंतर्गत उद्योजक आपल्या भेटीला हा अत्यंत उद्योजकीय विकास करण्याच्या दृष्टीने उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये उद्योजकांचे मार्गदर्शन व व्यवस्थापकीय कौशल्य या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. वरील दोन्ही उपक्रम अतिशय अल्प फीस रुपये ३६५ मध्ये मिळणार आहे. याचबरोबर 50 addon courses सुद्धा मोफत देण्यात येणार आहेत याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपला विकास करून घ्यावा असे आवाहन करीत आहे.

या शैक्षणिक वर्षांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू केले जाणार आहे यामुळे विद्यार्थ्यांना पुढील अनेक संधी प्राप्त होणार आहेत. कौशल्य विकासाची सोय नवनिर्मितीला चालना पालकांचा सहभाग विद्यार्थ्यांचा बौद्धिक शारीरिक व मानसिक विकास शक्य होणार आहे. तसेच शालेय स्तरावर सत्र पद्धती लागू होणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास किती झाला हे तपासता येणार आहे. या धोरणामुळे खाजगी संस्थानाही शिक्षण क्षेत्रात संधी प्राप्त होणार आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकरण मुक्त शिक्षणाचा पर्याय विद्यार्थ्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्यास या नवीन शिक्षण धोरणामुळे मदत मिळणार आहे. हे धोरण शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरणार आहे. शिक्षण क्षेत्राकरिता जीडीपीच्या सहा टक्के पर्यंत आर्थिक तरतूद केली जाणार आहे.

महाविद्यालयात स्वयंम कोर्स मार्गदर्शन केंद्र उपलब्ध आहे. विद्यार्थी हा महाविद्यालयाचा केंद्रबिंदू असून शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कृत, जबाबदार परिपूर्ण व अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विद्यार्थी तयार व्हावा यासाठी हुशार आणि मेहनती प्राध्यापक वर्ग धडपडत आहे. आमच्या संस्थेचे अध्क्षय, सचिव व संचालक मंडळ तसेच प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील आहेत.

आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपुर्वक स्वागत व आपल्या उज्जवल भविष्याकरिता शुभेच्छा !

**डॉ. धालगडे ए. बी.**
प्राचार्य
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ

# वरिष्ठ महाविद्यालय (पदवी अभ्यासक्रम)

## Art's (कला)

### बी.ए. प्रथम वर्ष : [CBCS Pattern]

**अनिवार्य विषय :** १. इंग्रजी
२. द्वितीय भाषा : हिंदी / मराठी

**ऐच्छिक विषय :**

खालील कोणत्याही तीन गटातील प्रत्येकी एक या प्रमाणे एक विषय निवडावे. द्वितीय भाषा म्हणून निवडलेला विषय ऐच्छिक म्हणून घेता येणार नाही.

**गट**

अ. इंग्रजी / समाजशास्त्र / लोकप्रशासन
ब. मराठी / अर्थशास्त्र
क. हिंदी / राज्यशास्त्र
ड. इतिहास / भूगोल

### बी.ए. द्वितीय वर्ष : [CBCS Pattern]

बी.ए. द्वितीय वर्षासाठी बी.ए. प्रथम वर्षाचेच विषय राहतील.

### बी.ए.तृतीय वर्ष : [CBCS Pattern]

बी.ए. तृतीय वर्षासाठी बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षाचे फक्त ऐच्छिक विषय राहतील.
याशिवाय बी.ए. तृतीय वर्षासाठी पर्यावरण अभ्यासक्रम हा १०० गुणांचा विषय अनिवार्य राहील.

### दूरशिक्षण (बहिस्थ) अभ्यास केंद्र - एम.ए. (M.A.)

मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन

### केंद्र समन्वयक - प्रा. एम.जी. गायकवाड

पदवीधारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण सुवर्णसंधी व प्रवेशासाठी वयाची अट नाही. मूळ कागदपत्राची आवश्यकता नाही. झेरॉक्स प्रतीनुसार प्रवेश पूर्ण करता येतात.
संपर्क - ७५०७८८९४९३, ८६६८२०७८१७

# B. COM. (वाणिज्य)

## बी.कॉम. प्रथम वर्ष : [CBCS Pattern]

| Semester - I | Semester - II |
|---|---|
| Fundamentals of Financial Accounting | Financial accounting |
| Business Statistics | Business statistics and mathematics |
| Fundamentals of business Communication | Modern business communication |
| Business Economics | Business Economics |
| **Elective (any one)** | |
| Computer for Business | Tally erp 9.0 |

## बी.कॉम. द्वितीय वर्ष : [CBCS Pattern]

| Semester - III | Semester - IV |
|---|---|
| Corporate accounting | Advanced Corporate accounting |
| Cost accounting | Advanced cost accounting |
| Principles of Business Management | Business Management |
| Mercantile Law | Corporate law |
| **Elective (any one)** | |
| Fundamentals of Income tax | Income tax law and practice |
| UGC vocational course | UGC vocational course |
| **Skill enhancement course (Any One)** | **Skill Enhancement Course (Any One)** |
| Management skill | Business Marketing |
| Banking service skill | Financial Markets |
| Basic accounting skills | E-commerce II |
| E-commerce | Retail business accounting |
| Six segma in marketing and sales | Supply chain management |

## बी.कॉम. तृतीय वर्ष : [CBCS Pattern]

| Semester - V | Semester - VI |
|---|---|
| Advanced Accounting | Advanced Accounting II |
| Management Accounting | Management Accounting II |
| auditing | auditing II |
| Human resource management | Marketing management II |
| Project and training work | Project and training work II |
| Banking And Finance | Banking And Finance |
| **SEC** - Accounting and Tally | **SEC** |
| **Compulsory** - Environmental studies | Accounting and auditing practices |

## दूरशिक्षण बहिस्थ (Distance Education)

**M.Com.** इंग्रजी माध्यम (English Medium)
संपर्क - ७५०७८८९४९३, ८६६८२०७८१७

# B. Sc. (विज्ञान)

## बी.एस्सी. प्रथम वर्ष : [CBCS Pattern]

**अनिवार्य विषय :** १. इंग्रजी

२. द्वितीय भाषा : हिंदी / मराठी

**ऐच्छिक विषय :**

खालील कोणताही एक गट निवडावा.

| गट | विषय |
|---|---|
| A. | Physics / Chemistry / Math |
| B. | Dairy Science / Zoology / Chemistry |
| C. | Dairy Science / Botany / Chemistry |
| D. | Environmental Science / Zoology / Chemistry |
| E. | Environmental Science / Botany / Chemistry |
| F. | Micro Biology / Zoology / Chemistry |
| G. | Micro Biology / Botany / Chemistry |

किमान कौशल्यावर आधारीत व्यावयायिक अभ्यासक्रम घेऊन १२ वी पास असणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ वीला जे विषय अभ्यासले आहेत. त्या संबंधीत विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विषय गटातील विषयासाठी प्रवेश मिळेल. विद्यापीठाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतरच अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित होईल. विद्यापीठाने मान्यता नाकारल्यास महाविद्यालय जबाबदार राहरणार नाही.

## बी.एस्सी. द्वितीय वर्ष : [CBCS Pattern]

बी.एस्सी. द्वितीय वर्षासाठी बी.एस्सी. प्रथम वर्षाचेच विषय राहतील.

## बी.एस्सी. तृतीय वर्ष : [CBCS Pattern]

बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी बी.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षाचेच फक्त ऐच्छिक विषय राहतील.
याशिवाय बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी पर्यावरण अभ्यासक्रम हा १०० गुणांचा विषय अनिवार्य राहील.

## SWAYAM

The Shivneri Mahavidyalaya Shirur Anantpal Dist -Latur establish NPTEL local chapter on 27 July 2020.

- SPOC Name–Mr.Prashant Ganpatrao Kumdale
- Designation - Assist.Professor, Department of Chemistry
- Partnering since - 27 July 2020
- College Id– 4043

SWAYAM or Study Webs of Active Learning for Young Aspiring Minds is a programme of the Ministry of Human Resource Development, Government of India,that enables professors and faculties of centrally funded institutions like IITs, IIMs,to offer online courses. Previously, the courses were only for the citizens of India, but now they are offered to anyone in the world having an internet connection.

SWAYAM, the free online education was developed by MHRD, Govt. Of India and AICTE with the help of Microsoft. It offers hundreds of courses with transferable credits.

- All courses are offered free of cost under this programme, however fees are levied in case the learner requires a certificate.

**वरिष्ठ महाविद्यालय प्रवेश पध्दती**

बी.ए. प्रथम वर्ष या वर्गासाठी नोंदणी करून गुणवत्तेनूसार प्रवेश दिला जाईल.

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) टी. सी. च्या सत्यप्रती ४ प्रतीत

२) गुणपत्रिकेची सत्यप्रती ४ प्रतीत

३) जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रती ४ प्रतीत(मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)

४) योग्यता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती ४ प्रतीत(महाराट्र राज्या बाहेरील विद्यार्थ्यांसाठी)

**अंतीम प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१) टी. सी. ची मुळप्रत २) गुणपत्रिकेची मुळप्रत

३) जातीच्या प्रमाणपत्राची मुळप्रत (मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी)

४) शिष्यवृत्ती मंजूरी क्रमांक (मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी)

५) ई.बी.सी. मंजुरी क्रमांक (आर्थिक दृष्ट्यामागास विद्यार्थ्यासाठी)

६) स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सिर्टीफिकेट)(विद्यापिठाबाहेरील विद्यार्थ्यासाठी)

७) विद्यापीठ योग्यता प्रमाणपत्र (Eligilblity Cerificate)

८) पासपोर्ट साईज दोन फोटो

## महाविद्यालयाचे नियम

**उपस्थितीसंबंधी**

१) दररोज नियमित आणि जादा तासाला विद्यार्थ्याची उपस्थिती घेतली जाते.

२) विद्यार्थ्याची प्रत्येक विषयाची दरमहा किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.

३) प्रत्येक महिण्यातील उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास

अ) पालकांना कळविले जाते.

ब) दंड आकारला जातो.

क) रेकॉर्ड बुक प्रमाणित केले जात नाही.

ड) महाविद्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती रद्द केल्या जातात.

इ) विद्यापिठाकडून परीक्षेला बसण्यासाठी परवानी दिली जात नाही.

ई) प्रवेश रद्द केला जातो.

४) सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा वक्तृत्व वादविवाद स्पर्धा एनएसएस शैक्षणिक सहली अथवा अन्य कारणासाठी विद्यार्थी महाविद्यालयात अनुपस्थित राहिल्यास प्रभारी प्राध्यापकांच्या स्वाक्षरीसह त्या त्या वेळीच अर्ज कार्यालयात दाखल करणे बंधनकारक राहील.

५. विद्यार्थी अजारी असल्यास आजारानंतर महाविद्यालयात येताना सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र आणून कार्यालयात दाखल करणे बंधनकारक राहील. तसेच जास्त दिवस आजारी असल्यास पालकाद्वारे महाविद्यालयास पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे. विद्यापिठाच्या नियमानुसार किमान ६५% उपस्थिती आवश्यक आहे. १०% आजारी रजेची सवलत देता येते.

**परिक्षेसंबंधी**

१) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या मासिक / सत्र / सराव / पूर्ववार्षिक परीक्षा देणे विद्यार्थ्यासाठी अनिवार्य आहे.

२) परिक्षेत ३०% पेक्षा कमी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

३) परीक्षेत अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

**महाविद्यालयाची शिस्त**

१) महाविद्यालयात शिस्तीबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जात नाही.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात व परिसरात शिस्त पाळणे आवश्यक आहे.

## खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो

१) ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे.

२) गटबाजी करणे.

३) गोंधळ घालणे

४) सामुहिक सुट्टी घेणे

५) विद्यार्थीनीची छेडछाड करणे

६) प्राध्यापकांचा आज्ञाभंग करणे

७) प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी उध्दट वर्तन करणे.

८) महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकांवर कोणताही मजकूर लिहिणे.

९) तंबाखू, पान खाणे, भिंतीवर थुंकणे

१०) वर्ग चालू असताना व्हरांड्यात रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे.

११) बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राने सूचना दिली जाते. त्याशिवाय विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो. शैक्षणिक सवलती बंद केल्या जातात. परीक्षा फॉर्म भरला जात नाही. प्रवेश रद्द केला जातो. विशिष्ट प्रसंगी विद्यार्थ्यावर पोलीस कार्यवाही केली जाते.

**विद्यार्थी संसद**

अ) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ प्रमाणे या शैक्षणिक वर्षासाठी खालील समितीमार्फत विद्यार्थी संसद गठीत करण्यात येईल.

१) अध्यक्ष - मा. प्राचार्य

२) एक नियुक्त प्राध्यापक

३) प्राध्यापक - राष्ट्रीय सेवा योजना

४) प्राध्यापक - क्रीडा विभाग

५) प्राध्यापक - सांस्कृतिक विभाग

ब) १) विद्यार्थी संसदेसाठी प्रत्येक वर्गातून विद्यापीठ कायद्याप्रमाणे वर्गप्रतिनिधींची निवड केली जाईल.

२) खालील विविध विभागातून प्रत्येकी एक विद्यार्थी प्रतिनिधी नियुक्त केला जाईल.

अ) क्रीडा विभाग

ब) राष्ट्रीय सेवा योजना

क) सांस्कृतिक विभाग

ड) दोन विद्यार्थी प्रतिनिधी

क) विद्यार्थी संसदेच्या नियुक्त सदस्यातून सचिव आणि विद्यापीठ प्रतिनिधीची निवड केली जाईल.

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यामध्ये सामाजिक जाणिव, श्रमप्रतिष्ठा व कलागुणांच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विविध उपक्रम राबविले जातात.

रक्तदान, ग्रामस्वच्छता, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत, वर्तमान ज्वलंत प्रश्नावर चर्चासत्र, कलापथक, पथनाट्य, अंधश्रध्दा निर्मूलन, वृक्ष लागवड

१) सहभागी विद्यार्थी संख्या १५०

२) युवक शिबीर ७५ विद्यार्थ्यासाठी दिवाळीच्या सुट्टीत ग्रामीण खेड्यात ०७ दिवसाचे निवासी शिबीर आयोजित केले जाते.

३) दोन वर्षे पुर्ण केलेल्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात येते.

४) बी.ए. तृतीय वर्षात कार्यरत असलेल्या विद्यार्थी स्वंयसेवकापैकी तीन उत्कृष्ट स्वयंसेवकांना परितोषिके दिली जातात.

५) मुलीसाठी वसतीगृहाची सोयःविद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वसतीगृहाची सुविधा उपलब्ध आहे.

## शैक्षणिक सहली

महाविद्यालयातर्फे दिवाळीच्या सुट्टीच्या कालावधीत भूगोल, इतिहास व इतर विषयांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.

## उद्योजकता विकास विभाग

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ उद्योजकता विकास विभाग यांच्या वतीने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योजक आपल्या भेटीला या करिअर कट्टा च्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींचे सविस्तर मार्गदर्शन व विद्यार्थ्यांमधील व्यवसायासंदर्भातील नकारात्मकता भीती एवढ्या कमी शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सायंकाळी ७ ते ८ या वेळेस मार्गदर्शन मिळणार आहे. याचबरोबर कौशल्य विकासाचे पाच (५) कोर्स यामध्ये मोफत मिळणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करणे अत्यंत गरजेचे आहे व अधिक माहितीसाठी पुढील नंबरवर संपर्क साधून आपले नाव समाविष्ट करावे.

समन्वयक - (१) डॉ. कुंडलवार एस.एल. मो. ९५०३७७०३७४, (२) प्रा. कुरे के. व्ही. मो. ८८८८३८८२५७, (३) डॉ. शिंदे के. यू. मो. ९५०३७५६७६२, (४) डॉ. लाटे एम.ए. मो. ९८८१८२३४९८.

## स्पर्धा परीक्षा विभाग

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग यांच्या वतीने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आय.एस.एस. आपल्या भेटीला या करिअर कट्टाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी करण्यासाठी व विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षेसंदर्भातील नकारात्मकता भीती कमी करण्यासाठी हा विभाग नेहमीच दैनंदिन विद्यार्थ्यांना अतिशय अल्प दरात वर्षाकरिता फक्त

रूपये ३६५ एवढ्या कमी शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सायंकाळी ६ ते ७ या वेळेस मार्गदर्शन मिळणार आहे. याचबरोबर कौशल्य विकासाचे पाच (५) कोर्स यामध्ये मोफत मिळणार आहेत यासाठी विद्यार्थ्यांनी आपली नाव नोंदणी करणे अत्यंत गरजेचे आहे व अधिक माहितीसाठी पुढील नंबरवर संपर्क साधून आपले नाव समाविष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे.

समन्वयक - (१) डॉ. जाधव ओ. डब्ल्यू मो. ९४२०२१३७०२, (२) डॉ. माने एस.व्ही. मो. ९४२३३४१८०५, (३) प्रा. लुटे व्ही. व्ही. मो. ९४२३७५९९३६, (४) प्रा. कुंमदाळे मो. ९९६०३०७५३३.

## प्लेसमेंट सेल

या विभागांतर्गत विद्यार्थ्यांना नोकरी आणि रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने स्पर्धा परीक्षा विभाग व्यवसाय मार्गदर्शन विभाग यांच्यातून यातून नोकरी आणि रोजगारांच्या संधीची उपलब्धता या विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते व काही कौशल्य विकास कोर्स करून तयारी करून घेतली जाते. या योजनेअंतर्गत महाविद्यालयात प्लेसमेंट सेलची निर्मिती केली जाते व या सेलद्वारे विद्यार्थ्यांना नोकरी विषयक व्यवसाय विषयक व्यक्तीमत्व विकास विषयक मार्गदर्शन केले जाते. थोडक्यात एका रोजगार मार्गदर्शन केंद्राची उभारणी करून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रासंबंधी मार्गदर्शन करून ही योजना प्रभावीपणे राबविली जाते. याकरिता तज्ञ प्राध्यापक मंडळींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते. यांचे समन्वयक पुढील प्रमाणे आहे. समन्वयक - डॉ. वागलगावे एच.डी. ९६७३६५६११४, प्रा. कुमदाळे पी.जी. ९९६०३०७५३३, प्रा. इंगळे ए. आर. ९४२३७३७२५६, प्रा. जाधव आर.एन. ९८२२७२२०७७, डॉ. कुंडलवार एस.एल. ९५०३७७०३७४

## क्रीडा विभाग

विद्यार्थी विद्यार्थीनींच्या अंगी खिलाडूवृत्तीचा विकास व्हावा, देशी - विदेशी खेळांची आवड निर्माण व्हावी, आरोग्य संवर्धन व्हावे. यासाठी महाविद्यालया तर्फे विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात.विद्यापिठाच्या सर्व क्रीडास्पर्धामध्ये महाविद्यालयाचा सहभाग असतो. महाविद्यालयात खालील क्रिडा सुविधा आहेत. (१) भव्य क्रिडांगण (२) इनडोअर बॅटमिंटन हॉल (३) अत्याधुनिक जिमन्याशियम हॉल इ.

## सांस्कृतिक विभाग

विद्यार्थ्याच्या अंगी असलेल्या सुप्त कुलागुणांना वाव देण्यासाठी (अभिनय, गायन, वादन, नृत्य) हा विभाग कार्यरत असतो. नाट्यछटा, एकांकिका, पथनाट्य बसविणे आणि सादर करणे. तसेच अशा प्रकारच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा आणि स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या युवक महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम हा विभाग करित असतो.

## भाषा व वाङ्मय मंडळ

कोणत्याही संस्कृतीची ओळख त्या त्या भाषेतील वैचारिक आणि ललित वाङ्मयावरून होत असते. प्रत्येक विद्यार्थी कलावंत किंवा सहृदय रसिक तरी नक्कीच असतो. महाविद्यालयातील वाड्:मय मंडळ कविता, कथा, वैचारिक, साहित्य इ. लेखनगुणांच्या विकासासाठी प्रयत्न करते.

महाविद्यालयात काव्यवाचन, कथाकथन, उस्फूर्त भाषण यांच्या स्पर्धा या मंडळामार्फत घेतल्या जातात. तसेच या मंडळामार्फत हस्तलिखित भिंतीपत्रक चालविले जाते. महापुरूषांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा या मंडळामार्फत आयोजित केली जाते.

**सामाजिक शास्त्र मंडळ**

मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याचा एकाच वेळी समाज, धर्म, अर्थकारण, राजकारण संस्कृती यांच्याशी संबंध येतो. जीवनाची ही सर्व अंगे एकमेकांशी संबंधित असतात. या मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्रांचा परिचय करूण देणे, मानवी जीवनातील स्थान समजून देणे हे मंडळाचे उद्दिष्ट आहे.

## ग्रंथालय विभाग

**ग्रंथालयाचे सर्वसाधारण नियम :**

१) ग्रंथालयातून ग्रंथ घेत असताना त्याची पाने तपासून घ्यावीत.

२) ग्रंथाची पाने फाडल्यावर पुस्तकांच्या किंमतीच्या दुप्पट किंमत वसूल करण्यात येईल.

३) ग्रंथ हरवल्यास किंवा खराब झाल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल; अन्यथा ग्रंथाच्या अद्यावत किंमतीच्या दुप्पट रक्कम वसुल केली जाईल. परंतु ग्रंथाची दुप्पट किंमत पन्नास रूपयापेक्षा कमी होत असेल तर कमीत कमी रू. ५० दंड आकारण्यात येईल.

४) अभ्यासिकेतून ओळखपत्रावर घेतलेली पुस्तके किंवा इतर वाचन साहित्य घरी जाताना परत करावीत. अन्यथा दररोज रू. १० याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५) दिवाळीच्या सुट्टीत नेहमीप्रमाणे देवघेव विभाग चालू राहिल.

६) ग्रंथालयातील कर्मचारी किंवा संबधिताशी असभ्य वर्तन व शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्याच्या ग्रंथालय सवलती बंद केल्या जातील. तसेच अशा विद्यार्थ्यास दंड आकारला जाईल अथवा प्रवेश रद्द केला जाईल.

७) ग्रंथालयासंदर्भात काही तक्रारी असल्यास ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

**देवघेव विभाग**

१) ग्रंथालयाच्या देवघेव विभागातून विद्यार्थ्यांना ओळख पत्रावर पाठ्यपुस्तके, कथा, कांदबऱ्या, चरित्र, समिक्षा, स्त्री साहित्य, संत सहित्य, व अन्य ग्रंथ फक्त ७ दिवसाकरीता दिले जातील.

२) संदर्भ ग्रंथ व दुर्मीळ ग्रंथ व स्पर्धा परिक्षेचे ग्रंथ बाहेर दिले जाणार नाहीत. मात्र ते वाचनकक्षात ओळखपत्रावर घेऊन वाचता येतील.

३) विद्यार्थ्यांना सात दिवसाकरीता ३ ते ४ ग्रंथ दिले जातील.

४) देवघेव विभाग सकाळी १० ते १ आणि दुपारी २ ते ५ या वेळेत चालू राहील.

५) ओळखपत्रावरील पुस्तके दिलेल्या मुदतीच्या आत परत न केल्यास प्रति आठवडा रू. १ याप्रमाणे विलंब शुल्क आकारला जाईल, मागणी व ग्रंथाच्या उपलब्धतेनुसार ओळखपत्रावर देण्यात आलेल्या पुस्तकाचे शक्य असल्यास नुतनीकरण करण्यात येईल परंतु काही विशिष्ट ग्रंथ (जादा मागणी असलेले) मुद्दाम जाणिव पूर्वक दिलेल्या मुदतीत परत न केल्यास प्रति दिन ५ रू. याप्रमाणे दंड आकारला जाईल.

**वाचन कक्ष**

१) विद्यार्थी / विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय.
२) वाचनालय सकाळी १० ते ५ पर्यंत उघडे राहील.
३) वाचनकक्षात ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही.
४) वाचनकक्षात पाठ्यपुस्तकाशिवाय स्पर्धात्मक परिक्षेची पुस्तके दैनिके नियतकातिके व प्रश्नपत्रिका संच वाचन साहित्य ओळखपत्रावर मिळेल.
५) वाचनकक्षात पाठ्यपुस्तकाशिवाय सेट / नेट विविध स्पर्धात्मक परिक्षेसाठी उपयुक्त ग्रंथ ओळखपत्रावर वर दिले जातात.
६) वाचन कक्षात विद्यार्थ्यांनी शांतता पाळावी इतरांना त्रास होईल असे वर्तन करू नये. बेशिस्त पणा व ग्रंथालय नियमाचे उल्लंघन करू नये.

## विशेष पुस्तक पेढी

१) बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षासाठी रू. ४०० /- तसेच बी.एस.सी., बी.कॉम. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी रू. ६०० /- ग्रंथालय शुल्क आकारून फक्त ऐच्छिक विषयाची सर्व पुस्तके शैक्षणिक वर्षासाठी दिले जातील. या शिवाय इतर ग्रंथ विद्यार्थ्यांना दिली जातील. या शिवाय इतर ग्रंथ विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक असल्यास त्यासंबधित ग्रंथाच्या किंमतीच्या ३५% रक्कम शुल्क (विना परवाना) भरल्यास मागणीप्रमाणे ग्रंथ उपलब्ध करून देण्यात येतील.
२) पुस्तक पेढीतून पुस्तके घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र आणणे आवश्यकआहे.
३) वार्षिक परीक्षा संपलेल्या तारखेपासून दहा दिवसाच्या आत पुस्तक - पेढीतील वर्षभरासाठी दिलेली क्रमिक पुस्तके परत करावीत अन्यथा पुस्तकास प्रतिदिन रू. १० /- या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

## शिस्त आणि आचारसंहिता

**शिस्त -** स्वयंशिस्त हीच सर्वोत्तम शिस्त होय. महाविद्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यास सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन नियम व अटीचे पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रशासनाच्या परवानगीशिवाय कोणतीही कृती कार्यक्रम करण्यास मज्जाव / बंदी राहील. कोणताही राजकीय किंवा अन्य स्वरूपाचा बाह्य दबाव महाविद्यालयावर आणल्यास शिस्तीचे उल्लंघन समजले जाईल. महाराष्ट्र सरकार कायदा आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करणारी विद्यार्थी परीक्षेत अपात्र ठरतील.

**आचार संहिता -**

१. महाविद्यालयात आणि महाविद्यालयातील प्रांगणात विद्यार्थ्याकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ते मागताक्षणी दाखवणे त्यास बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी बाहेरील व्यक्तींना सोबत आणू नये.
२. विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या परवानगीशिवाय इतर विद्यार्थी किंवा बाहेरील कोणत्याही व्यक्तीकडून कसल्याही प्रकारचा निधी गोळा करू नये.

३. वर्गामध्ये तास चालू असताना विद्यार्थ्यांनी वरंड्यात रेंगाळत/फिरू व थांबू नये. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश केल्यानंतर आपला मोबाईल बंद स्वरूपात ठेवावा. मोबाईल वाजल्यास जप्त करण्यात येईल.

४. विद्यार्थ्यांनी प्राचार्यांच्या लिखित परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारची शैक्षणिक सहल, मोहिम भेट, वन समारंभ, वाढदिवस, वनभोजन इत्यादी प्रकारचे समारंभ आयोजित करू नये.

५. रॅगिंग सदृश्य वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यावर प्रोव्हीबीशन ऑफ रॅगिंग १९९९ कलम ३३ ऑफ ९९ नुसार कारवाई केली जाईल.

६. महिला छेडछाड प्रतिबंधक अधिनियम नुसार, नियमबाह्य वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यावर कारवाई करण्याचे अधिकार प्राचार्यांना असतील व त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

**गैरवर्तन**

१. पान, तंबाखू, गुटका, मावा इत्यादी खाणे, धूम्रपान करणे, भिंतीवर थुंकणे ह्या बाबी शैक्षणिक संस्थासह सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास बंदी आहे.

२. ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे गटबाजी करणे, गोंधळ करणे, भांडणे करणे विद्यार्थीनींची छेडछाड करणे, महाविद्यालयात इमारतीवर, फलकावर बोर्डवर, डैक्सवर असभ्य मजकूर लिहिणे, चित्र काढणे, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी उध्दट वर्तन करणे व आज्ञा भंग करणे. वरील गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम ताकिद दिली जाईल, दंड वसूल केला जाईल शैक्षणिक सवलती बंद केल्याजातील परीक्षा अर्ज भरजा जाणार नाही प्रवेश रद्द केला जाईल व विशिष्ट प्रसंगी अशा विद्यार्थ्यांवर पोलीस कारवाईसुध्दा केली जाईल.

## सायकल स्टँड (पार्किंग सोय)

१) वाहनधारक विद्यार्थ्यांनी आपली वाहने पार्किंग झोन मध्ये ठेवणे बंधनकारक आहे.

२) आपले वाहन कुलूप लावल्याशिवाय ठेऊ नये.

## ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यासाठी लागणारी कागदपत्रे

| | | |
|---|---|---|
| नादारी अर्ज | - | दोन प्रती मध्ये |
| उत्पन्नाचा दाखला | - | दोन प्रती मध्ये |
| अपत्य प्रमाणपत्र | - | दोन प्रती मध्ये |

**टिप :** १) प्रमाणपत्र तहसीलदारच्या सही-शिक्याने असावेत.

२) ई.बी.सी. फॉर्म प्रवेश घेतेवेळी दाखल करावेत.

३) ई.बी.सी. फार्मवर खाडाखोड करू नये.

# शिष्यवृत्ती

गुणवत्ताधारक आणि पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्यांची सोय उपलब्ध करून दिली जाते.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | गुणांची किमान % | उत्पन्नाची मर्यादा | लागणारी कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | राज्य सरकार खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | इयत्ता १२ वी ७५% गुण | उत्पन्नाची अट नाही | १) मार्क्स मेमोची सत्यप्रत |
| २ | अपंग शिष्यवृत्ती | ४५ % गुण व ४५ % अपंगत्व | १,००,०००/- | १) अपंगत्व दर्शविणारे सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र<br>२) टी.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>३) उत्पन्न दाखला (तहसीलदार) |
| ३ | सैन्यातील जवानांच्या मुलांना शैक्षणिक मदत | - | - | १) टी.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>२) जिल्हा सैनिक बोर्डाचे योग्यता प्रमाणपत्र |
| ४ | मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती प्रथम वर्ष कला वाणिज्य व विज्ञान | मागील वर्षी उत्तीर्ण | - | १) टी.सी. व मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>२) जातीचे प्रमाणपत्र सत्यप्रत<br>३) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (मुळप्रत)<br>४) वडील वारल्याचे प्रमाणपत्र (वडील हयात नसतील तर)<br>५) शिष्यवृत्ती आदेश क्रमांक<br>६) १० रू. च्या बाँडवर प्रतिज्ञापत्र (शिष्यवृत्ती खंडीत झाली असेल तर)<br>७) जिल्हा बदलीचे प्रमाणपत्र (इतर<br>८) जिल्ह्यातूनआलेल्या विद्यार्थ्यासाठी)<br>९) मागील मंजूरी आदेश क्रमांक<br>१०) एस.एस.सी मार्कमेमो झेरॉक्स<br>११) आधार कार्ड, नॉन-क्रिमीनल<br>१२) SBI/SBH खाते क्रमांक |
| ५ | जी.ओ.आय.फ्रि.शिप फी माफी योजना | मागासवर्गीय पुन: प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास | उत्पन्नाची अट नाही | १) जी.ओ.आय. फ्रिशिपचा फॉर्म भरणे<br>२) मार्क्स मेमोची सत्यप्रत<br>३) जातीचे प्रमाणपत्र<br>४) मागील मंजूरी आदेश क्रमांक<br>५) तहसील दाराचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र |

टिप : १) वरील शिष्यवृत्तीसाठी या कार्यालयामार्फत मंजुरीसाठी शिफारस केली जाते. संबंधीत विभागाकडून गुणानुक्रमे मंजुरी जाते व त्यांनर संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप केली जाते.

२) सर्व शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै असते. ७५% पेक्षा कमी हजेरी असल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

## डॉ. जाधव ओ. डब्ल्यू. (प्रभारी प्राचार्य)

## प्राध्यापक वृंद

**भूगोल विभाग**

डॉ. जाधव ओ. डब्ल्यू.
(विभाग प्रमुख तथा प्रभारी प्राचार्य)
डॉ. वागलगावे एच. डी.
प्रा. कांबळे एस. एन.

**इंग्रजी विभाग**

डॉ. शिंदे पी. आर.
(विभाग प्रमुख)
प्रा. कुरे के. व्ही.

**मराठी विभाग**

प्रा. रोडगे जी. एस
(विभाग प्रमुख)
प्रा. गायकवाड एम. जी.

**हिंदी विभाग**

प्रा. इंगळे ए. आर
(विभाग प्रमुख)
डॉ. जाधव डी. बी.

**इतिहास विभाग**

डॉ. एन. बी. सुर्यवंशी
(विभाग प्रमुख)

**लोकप्रशासन विभाग**

प्रा. शेख एस. एल.
(विभाग प्रमुख)

**अर्थशास्त्र विभाग**

डॉ. सोमवंशी एम. वाय
(विभाग प्रमुख)

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. धुमाळे डी. के.
(विभाग प्रमुख)

**समाजशास्त्र विभाग**

डॉ. मुंडे पी. आर
(विभाग प्रमुख)

**वाणिज्य विभाग**

डॉ. माने एस. व्ही.
(विभाग प्रमुख)
डॉ. कुंडलवार एस. एल.

**रसायनशास्त्र विभाग**

डॉ. बोंडगे ए. एस.
(विभाग प्रमुख)
प्रा. माने. एस. वाय.
प्रा. कुमदाळे पी. जी.

**गणित विभाग**

प्रा. वडनेरे एस. एम.
(विभाग प्रमुख)

**प्राणीशास्त्र विभाग**

डॉ. जाधव आर. आर.
(विभाग प्रमुख)

**दुग्धशास्त्र विभाग**

प्रा. लुटे व्ही. व्ही.
(विभाग प्रमुख)
प्रा.श्रीमती खरोबे व्ही. बी.

**पर्यावरणशास्त्र विभाग**

डॉ. मुके व्ही. के.
(विभाग प्रमुख)
डॉ. लाटे ए. एम.

**वनस्पतीशास्त्र विभाग**

डॉ. रायभोळे यू. के.
(विभाग प्रमुख)
डॉ.श्रीमती शिंदे जे. यू.

**भौतिकशास्त्र विभाग**

प्रा. वाकडे एम. डी.
(विभाग प्रमुख)
प्रा. शिंदे के. यू.

**सूक्ष्मजीवशास्त्र विभाग**

प्रा. जाधव आर. एन.
(विभाग प्रमुख)
प्रा. अंधारे आर. ए.

**क्रीडा विभाग**

प्रा. हालसे बी. पी.
(विभाग प्रमुख क्रिडा)

**ग्रंथालय विभाग**

प्रा. सुर्यवंशी के. ए.(ग्रंथपाल)

## शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

श्री. जागले व्ही. एल. (मुख्य.लिपीक)
श्री. शिंदे बी. टी. (वरिष्ठ लिपीक)
श्रीमती जाधव एस. टी. (कनिष्ठ लिपीक)
श्रीमती कोटलवार व्ही. डी. (ग्रंथालय परिचर)
श्री. शिंदे एस. ओ. (प्रयोगशाळा सहाय्यक)
श्री. कुंभार व्ही. बी. (प्रयोगशाळा परिचर)
श्री. लिंबापूरे बी. डब्ल्यू. (प्रयोगशाळा परिचर)
श्री. नागटिळक एस.एल. (प्रयोगशाळा परिचर)
श्री. जगताप डी. एच. (प्रयोगशाळा परिचर)
श्री. कुंभार एस. व्ही. (सेवक)
श्री. सुर्यवंशी एस. एच. (सेवक)
श्री. तांबोळी एफ. एम. (सेवक)
श्री. गायकवाड एल. एन. (सेवक)

# रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम

रॅगिंग करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये रॅगिंग करणाऱ्याला कठोर शिक्षेची तरतुद असलेला अधिनियम प्रसारित केला. रॅगिंगसंदर्भात या विद्यापीठात रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली असून या अधिनियमाची कठोर अंमलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग हा दुसऱ्या विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्तन करण्याचा घृणास्पद अमानवी व विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे खच्चीकरण तर होतेच, परंतु रॅगिंगमुळे प्रसंगी एखादा विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबीचा अंतर्भाव होतो.

१. नवप्रवेशित विद्यार्थ्याला बोलून, लिहून, चिडवून, उद्धटपणे वागून त्याला / तिला मानसिक किंवा शारीरिक इजा पोहचविणे.

२. इतर मानहानी करणारे व हल्ला उत्पन्न करणारे वर्तन करणे.

३. नवप्रवेशित विद्यार्थ्यांवर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोरजुलूम करणे, दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांनी शिक्षा देणे इ.

४. प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.

**रॅगिंग करणाऱ्याला शिक्षा** : या अधिनियमात रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतुद आहे.

दोषी विद्यार्थ्याला खालीलपैकी. एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जावे लागेल.

- वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभापासून वंचित करणे.
- शिष्यवृत्ती, फेलोशिप, यापासून वंचित करणे.
- परीक्षेसाठी अपात्र ठरविणे.
- निकाल राखून ठेवणे.
- कोणत्याही युवक महोत्सव, टुर्नामेंटमध्ये सहभागास प्रतिबंध करणे.
- एक ते चार सत्रापर्यंत निलंबीत करणे.
- शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करणे, तसेच इतर कोणत्याही शिक्षण संस्थेत काही काळासाठी प्रवेशापासून वंचित करणे.

आणीबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी / विद्यार्थीनींना रॅगिंग प्रतिबंधक समितीकडे संपर्क साधावा.

**समन्वयक**

**डॉ. जाधव ओ. डब्ल्यू.** | **प्रा. धुमाळे डी. के.**

**प्रा. हालसे बी. पी.** | **डॉ. बोडगे ए. एस.**

# 2023- 24 विद्यापीठ नियमानुसार आकारण्यात येणारी प्रवेश फीस

| Sr.No. | Particulars of The Fee | B.A. | B.Sc. | B.Com. |
|---|---|---|---|---|
| 1 | Prospectus And Form Fee | 60 | 60 | 60 |
| 2 | Registration | 20 | 20 | 20 |
| 3 | Admission Fee | 50 | 50 | 50 |
| 4 | Library Fee | 150 | 150 | 0 |
| 5 | Bank Book | 10 | 10 | 150 |
| 6 | Identity / BT Card | 15 | 15 | 10 |
| 7 | Laboratory Fees | 300 | 1500 | 15 |
| 8 | Environmental Fees | 0 | 0 | 0 |
| 9 | Eligibility Fees | 100 | 100 | 100 |
| 10 | Eligibility Form Fee | 10 | 10 | 10 |
| 11 | University Emergency | 15 | 15 | 15 |
| 12 | Student Council Fees | 20 | 20 | 20 |
| 13 | Annual Social Gathering | 70 | 70 | 70 |
| 14 | Terminial Examination | 35 | 35 | 35 |
| 15 | College Gymkhana | 75 | 75 | 75 |
| 16 | University Sport Fees | 100 | 100 | 100 |
| 17 | Student Welfare Fees | 60 | 60 | 60 |
| 18 | Youth Festival | 50 | 50 | 50 |
| 19 | College Magazine Fees | 50 | 50 | 50 |
| 20 | Student Insurance Fee | 27 | 27 | 27 |
| 21 | Medical Fees | 5 | 5 | 5 |
| 22 | College Development | 75 | 75 | 75 |
| 23 | Ashwmedh | 30 | 30 | 30 |
| 24 | Chancellor Fees | 32 | 32 | 32 |
| 25 | Miscellaneous Fee | 26 | 26 | 26 |
| 26 | Internet | 600 | 600 | 600 |
| 27 | Software Fees | 120 | 120 | 120 |
| 28 | Self Finance Unit | 10 | 10 | 10 |
| 29 | Sports & Cultural Activity | 20 | 20 | 20 |
| 30 | Admission Processing Fee | 10 | 10 | 10 |
| 31 | Tution Fees | 1100 | 1100 | 1100 |
|  | Total | 3245 | 4445 | 2945 |

A) The eligibility fee is applicable to B.A., B.Com., B.Sc. 1st Year Only.
B) The Laboratory fee is appicalbe only to the courses having practial paper.
C) The Environmental Fee is applicable only to the B.A./B.Sc./B.Com III rd year.

**Note : Fee once paid is not refundable on any account.**

# संस्था कार्यकारिणी समिती समिती

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | स्व. ॲड. विश्वंभरराव शंकरराव माने | संस्थापक अध्यक्ष |
| २ | श्री प्रतापराव विश्वंभरराव माने | अध्यक्ष |
| ३ | श्री सुतेज प्रतापराव माने | उपाध्यक्ष |
| ४ | श्री पद्माकर गोविंदराव मोगरगे | सचिव |
| ५ | श्री जयेश विश्वंभरराव माने | कोषाध्यक्ष |
| ६ | सौ. छाया जयेश माने | सहसचिव |
| ७ | श्रीमती मीना तुकाराम माडे | संचालक |
| ८ | सौ. बबीता पद्माकर मोगरगे | संचालक |



श्री प्रतापराव विश्वंभरराव माने
अध्यक्ष



श्री सुतेज प्रतापराव माने
उपाध्यक्ष



श्री पद्माकर गोविंदराव मोगरगे
सचिव



श्री जयेश विश्वंभरराव माने
कोषाध्यक्ष



सौ. छाया जयेश माने
सहसचिव




श्रीमती मीना तुकाराम माडे
संचालक



सौ. बबीता पद्माकर मोगरगे
संचालक


महाविद्यालय इमारत


महाविद्यालयाचे वसतीगृह


इनडोअर हॉल